महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २१० वा | दिनांक : १३/०६/२०२५ | वार : शुक्रवार

## अहमदाबाद विमान अपघात, एका ब्रिटिश नागरिकासह २ जण बचावले



**अहमदाबाद :** अहमदाबादमध्ये एअर इंडियाचे बोईंग ७८७ ड्रीमलायनर विमान कोसळले आहे. विमानातील सर्व २४२ जणांचा मृत्यू झाला आहे. गुजरात पोलिस आयुक्तांच्या हवाल्याने वृत्तसंस्था एपीने ही माहिती दिली.

वृत्तसंस्था एएनआयने पोलिस आयुक्तांच्या हवाल्याने सांगितले की, विमानातील सीट क्रमांक ११-ए वर बसलेले भारतीय वंशाचे ब्रिटिश नागरिक रमेश विश्वास कुमार हे अपघातातून वाचले. त्यांचा व्हिडिओही समोर आला आहे. आणखी एक जिवंत प्रवाशाला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. यापूर्वी एपीने म्हटले होते की विमानातील सर्व लोकांचा मृत्यू झाला आहे.

विमानात २३० प्रवासी होते. यामध्ये १६९ भारतीय, ५३ ब्रिटिश, ७ पोर्तुगीज आणि एका कॅनेडियन नागरिकाचा समावेश होता. उर्वरित १२ जण क्रू मेंबर्स होते.

अपघातस्थळी सापडलेले बहुतेक मृतदेह इतके जळालेले आहेत की त्यांची ओळख पटवणे अत्यंत कठीण आहे. डीएनए चाचणीनंतरच त्यांची ओळख पटवणे शक्य होईल.

या अपघातात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांचाही मृत्यू झाला. भाजपचे राज्यसभा खासदार परिमल नाथवानी यांनी एक्स वर ही माहिती दिली. तथापि, काही वेळाने त्यांनी त्यांची पोस्ट डिलीट केली.

ज्या इमारतीला विमान धडकले त्या इमारतीत अहमदाबाद सिव्हिल हॉस्पिटलचे डॉक्टर राहतात. माहितीनुसार, १५ डॉक्टर जखमी झाले आहेत.

एअर इंडियाचे विमान क्रमांक AI-171 दुपारी १:३८ वाजता उड्डाण केले. ते दुपारी १:४० वाजता कोसळले.

मिळालेल्या माहितीनुसार, विमान विमानतळाच्या भिंतीजवळ आणि एअर कस्टम कार्गो ऑफिसजवळ कोसळले. विमान पडताच संपूर्ण परिसरात धुराचे लोट दिसले.

## त्यांच्या आरोग्याला काही झाले तर सत्ताधाऱ्यांना रस्त्यावर फिरू देणार नाही, रोहित पवारांचा इशारा



**अमरावती :** बच्चू कडू यांची प्रकृती खालावली आहे. त्यांच्या आरोग्याला काही झाले, तर आम्ही एकाही सत्ताधारी खासदार, आमदाराला रस्त्यावर फिरू देणार नाही, असा इशारा राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी दिला आहे. रोहित पवारांनी आज मोझरी येथे जाऊन बच्चू कडू यांची भेट घेतली. यावेळी बोलताना त्यांनी हा इशारा दिला आहे.

रोहित पवार म्हणाले, शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळावी, अशी आमची मागणी आहे. बच्चू कडू हे गेल्या पाच दिवसांपासून त्यासाठी उपोषण करीत आहेत. पण, सरकारने अजूनही आमच्या मागण्यांची दखल घेतलेली नाही. निवडणुकीच्या वेळी महायुतीने कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. ते पूर्ण का करीत नाही, असा आमचा सवाल आहे. बच्चू कडू यांची प्रकृती खालावली आहे. त्यांच्या आरोग्याला काही झाले, तर आम्ही एकाही सत्ताधारी खासदार, आमदाराला रस्त्यावर फिरू देणार नाही.

पुढे बोलताना रोहित पवार म्हणाले, या सरकारजवळ मंत्र्यांच्या परदेश दौऱ्यांसाठी पैसा आहे. लॅपटॉप वाटण्यासाठी निधी आहे. रस्ते बांधताना मलिदा खाण्यासाठी पैसा आहे, पण शेतकऱ्यांसाठी या सरकारजवळ निधी नाही, हे पचनी पडणारे नाही. महाराष्ट्रातील जनतेचा स्वाभिमान विकत घेता येऊ शकतो, या भ्रमात महायुती सरकार आहे. पण, आता या फसव्या सरकारच्या भुलथापांना बळी पडता कामा नये. आता आपल्या हक्कांसाठी रस्त्यावर उतरावे लागणार आहे. शेतकरी आपल्या शेतात रक्ताचे पाणी करतो. आम्ही कोणाचे मिंधे नाहीत. सरकारला आता आमच्यासमोर झुकावे लागेल. सरकारला त्याची किंमत मोजावी लागेल, असा इशारा त्यांनी दिला.

सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना यंदा प्रचंड नुकसान सहन करावे लागले. त्यांना दिलासा देण्यासाठी भावांतर योजना लागू करावी, अशी मागणी आम्ही विधानसभेत केली होती, पण सरकारने त्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप रोहित पवारांनी केला. तसेच विरोधी पक्षात असलेल्या नेत्यांना आपल्या पक्षामध्ये आणण्यासाठी त्यांच्याकडे पक्षांतर योजना आहे, पण शेतकऱ्यांना भावांतर नाही. सोयाबीन उत्पादकांचे चार हजार कोटी रुपयांचे नुकसान झाले, त्याला जबाबदार कोण आहे. याचे उत्तर सरकार देत नाही. तसेच कापूस, तूर पिकाचे झाले आहे.

कापूस उत्पादक शेतकऱ्यांना अत्यंत कमी किमतीत कापूस विकावा लागला. तुरीला भाव नाही. अशा स्थितीत शेतकऱ्यांनी जगावे कसे, हा प्रश्न निर्माण झाला आहे. शेतकऱ्यांना नुकसान सोसावे लागत असताना सरकारने मदत करावी, अशी अपेक्षा आहे. पण, कुणालाही त्याचे घेणेदेणे नाही, असे म्हणत रोहित पवारांनी सरकारवर जोरदार टीका केली.

## राज्यात भाजपकडून ठाकरे आणि पवार ब्रँड संपवण्याचा प्रयत्न

**मुंबई :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे आणि ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे एकत्र येणार असल्याच्या चर्चा गेल्या अनेक दिवसांपासून महाराष्ट्रात सुरू आहेत. परंतु आज राज ठाकरे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईतील ताज हॉटेलमध्ये भेट घेतली. त्यांच्यात जवळपास तासभर चर्चा झाली. या भेटीमुळे आता राज ठाकरे नेमकी भूमिका काय घेणार आहेत, असा संभ्रम निर्माण झाला आहे.

चित्रपट निर्माते व दिग्दर्शक महेश मांजरेकर यांच्या यूट्यूब चॅनलवर झालेल्या मुलाखतीत राज ठाकरे यांनी माझ्यासाठी महाराष्ट्राचे हित मोठे आहे तर इतर सर्व दुय्यम आहे. मी आमचे किरकोळ वाद बाजूला ठेऊ शकतो. मी उद्धव यांच्या सोबत काम करण्यास तयार आहे, परंतु प्रश्न फक्त एवढाच आहे की ते माझ्यासोबत काम करण्यास तयार आहेत का, असे विधान केले होते. त्यानंतर उद्धव ठाकरेंनी देखील सकारात्मक प्रतिसाद दिला होता. त्यामुळे दोघेही ठाकरे बंधू एकत्र येणार असे तयार झाले होते. तसेच राज ठाकरे यांनी महायुतीसह भाजपवर देखील टीका केली होती.

राज ठाकरे यांनी १५ दिवसांपूर्वीच भाजपवर जाहीरपणे टीका केली होती. एका मुलाखतीत बोलताना राज्यामध्ये भाजपकडून ठाकरे आणि पवार ब्रँड संपवण्याचा प्रयत्न सुरू असून यात कोणताही वाद नाही, असे स्पष्ट म्हटले होते. मात्र तो ब्रँड संपवणे शक्य नसल्याचेही त्यांनी म्हटले होते. पुण्यात 'इंडिया टुडे'च्या कार्यक्रमात बोलताना त्यांनी हे विधान केले होते. तसेच नेते बदलले तरी ब्रँड राहील, असेही त्यांनी म्हटले होते.

राज ठाकरे म्हणाले होते, राज्यातील विचार करता राज म्हणाले की माझे आजोबा प्रबोधनकार ठाकरे यांनी सर्वात प्रथम राज्याच्या राजकारणावर प्रभाव टाकला होता. त्यांच्यानंतर बाळासाहेब ठाकरे होते. माझे वडील श्रीकांत ठाकरे सुद्धा होते.त्यांनी संगीतावर प्रभाव टाकला होता. त्या दोघांनंतर उद्धव आणि मी आहे. एकंदरीतच गेल्या काही दिवसातल्या त्यांच्या मुलाखतीतून ठाकरे बंधू एकत्र येणार असल्याच्या चर्चा वाढल्या होत्या. मात्र, आज त्यांनी फडणवीस यांची भेट घेत तासभर चर्चा देखील केली, त्यामुळे संभ्रम निर्माण झाला आहे.

राज ठाकरे यांनी काही दिवसांपूर्वीच एक फोटो सोशल मीडियावर पोस्ट करत भाजपवर सडकून टीका केली होती. ते म्हणाले होते, मी एक फोटो पाहिला. तो सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. एका कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अजित पवार, सुनील तटकरे, अशोक चव्हाण, नारायण राणे, छगन भुजबळ आणि इतर नेत्यांच्या मध्यभागी बसले होते. मी तो फोटो पाहिला तेव्हा मला आश्चर्य वाटले आणि विचार केला की भाजपचे समर्थक त्याकडे कसे पाहत आहेत? त्यांना वाटले पाहिजे की आम्ही त्यांना सत्तेवरून हाकलून लावण्यासाठी खूप मेहनत केली आणि आता ते त्यांच्यासोबत सरकारमध्ये बसले आहेत. परंतु आता देवेंद्र फडणवीस यांचे भेटीनंतर राज ठाकरे त्यांच्या भूमिकेवर ठाम राहणार की महायुतीसोबत जुळवून घेणार? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १३ जून २०२५


## घ्या मार्गदर्शन कृषीचे बाप हो.....

खत टाका खोडा चमच्याने, पाणी द्या थेंबा-थेंबाने
बहरे झाडे पाना-फुला,उत्पन्न बघा निघेते टनाने
जणा हो ऐका सांगतो विनम्रतेने ।।१।।



घ्या मार्गदर्शन कृषीवलाचे परीक्षण करा हो मातीचे ठिबकाने सोडा पाणी खत, मानून प्रमाणाचे महत्व यंत्राने उत्पन्न होईल पुरे जणा हो, ऐका सांगतो नम्रतेने ।।२।।

शेती करा तंत्राने-यंत्राने,नको आता पूर्व पद्धती,
करा मनाचा निर्धार बापाहो, खर्च जास्त होती,
उत्पन्नास श्रम कमी होऊन अर्थाजन वाढती ,II३II

होती सालो-साल कर्ज डोई,दुर्दैवी कर्मगती
शेतकरी इमाने,पण घेतो फाशी जणा हो ऐका सांगतो नम्रतेने शेती करा हो आता यंत्र आणि-तंत्राने ।।४ II

जीवनाचे मोल / 57
कवी : उत्तम श्यामराव शेजवळ,डोणगाव
ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजी नगर

**प्रतिनिधी पडेगाव शिवाजी गायकवाड**

## "क्या हुआ तेरा वादा?" - उबाठा शिवसेनेच्यावतीने कन्नड मध्ये ट्रॅक्टर मोर्चा




**कन्नड (स्वप्नील राठोड) :** प्रतिनिधी:-स्वप्नील राठोड — शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी उबाठा शिवसेनेच्यावतीने कन्नड शहरातील पिशोर नाका येथून तहसील कार्यालयापर्यंत भव्य ट्रॅक्टर मोर्चा काढण्यात आला. "क्या हुआ तेरा वादा?" या घोषवाक्याखाली मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.शेतकऱ्यांना कर्जमुक्ती, "शेतकरी सन्मान योजना" अंतर्गत दरमहा ₹१५,००० रुपये मिळावेत, महिलांसाठी ₹२१०० अनुदान मिळावे, शेतीमालाला हमीभाव मिळावा, तसेच शेतीसाठी २४ तास अखंड वीजपुरवठा व्हावा — या सरकारने दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी झालेली नाही, असा आरोप मोर्चेकऱ्यांनी केला.मोर्चाची सांगता तहसील कार्यालयात निवेदन देऊन करण्यात आली. यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून होता..

## श्री क्षेत्र देवगिरी ते श्रीक्षेत्र पंढरपूर संत जनार्धन स्वामी महाराज संस्थान पालखी चे प्रस्थान




**दौलताबाद (जावेद अहमद) :** तापत्रेय तापलिया पंढरीसी यावे :दरुषणे मुक्त व्हावे हळाम्हात्रे /१/दु:खाची विश्रांती सुखाचा आनंद /पाहता चिदानंद विठ्ठल देव //२//संसारी तापले त्रितापे आहाळले /विश्रांतीये आली पंढरीसी //३//सर्वांचे माहेर भाविकांचे घर /एका जनार्दनीं केला असे //४// संत जनार्दन स्वामी महाराज पालखी श्रीक्षेत्र आनंदेवाडा येथून दि १२, गुरुवारी रोजी दौलताबाद किल्ल्यावर संत जनार्धन स्वामी यांच्या पादुकेचे अभिषेक करून प पू गुरुवर्य वै बाबुराव महाराज आनंदे यांच्या आशीर्वादाने .ह भ प अण्णा महाराज आनंदे ,यांचे चिरंजीव बाबा महाराज आनंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ह भ प मुरारी महाराज आनंदे दिंडी चालक आहे यांच्या नेतृत्वाखाली रवाना झाली.नगर ,करमाळा, करत दि ०५ जुलै रोजी पंढरपूर येथे पोहचेल आषाढी शुद्ध एकादशीला पादुकेस चंद्र भागेचे स्नान ,नगर प्रदीक्षिणा ०६ जुलैला ,१० जुलै रोजी पंढरपूर येथे काला करून २१ जुलै रोजी दौलताबाद येथे संध्याकाळी चार वाजता पोहचल या दिंडी मध्ये १५०० वारकरी भाग घेतील शासना तर्फ पाण्याचे टँकर ,आरोग्य पथक, वैद्यकीय अधिकारी ही सुविधा उपलब्ध करून दिली आहेया दिंडीची ११५ वर्षाची परंपरा सद्गुरू बाबुराव महाराज आनंदे यांनी शके १८३२ साली दौलताबाद किल्ल्यावरून संत जनार्धन स्वामींची पालखी काढली होती.ही माहिती ह भ प बाबासाहेब महाराज यांनी दिली आहेयावेळी उपसरपंच सैय्यद मतीन,ह भ प उद्धव आनंदे, ह भ प परमेश्वर महाराज कोरडे,ह भ प नारायण महाराज कोरडे,कमलाकर पेरे,वैद्यकीय अधिकारी श्रध्दा स्वामी,रामदास इंगळे,सुरेश चिनुके,ज्ञानेश्वर गवळी,विश्वभर आनंदे, आरोग्य सेवक मनीष फुलारे, आशाताई, ग्रामस्थ महिला व भाविक मोठ्या प्रमाणावर उपस्


प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १३ जून २०२५


## शेतकऱ्यांच्या संपूर्ण कर्जमाफीसाठी उद्धव ठाकरे पक्षाचा चक्का जाम




**छत्रपती संभाजीनगर :** राज्यातील शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी मिळावी यासाठी तसेच महायुती सरकारने दिलेल्या आश्वासनाचा विसर पडल्याचा आरोप करत, त्याचा जाब विचारण्यासाठी शिवसेना - उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हास्तरीय चक्का जाम आंदोलन करण्यात आले. शहरातील बाबा पेट्रोल पंप येथील चौकात शिवसेना नेते तथा राज्याचे विधान परिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले.

बाबा पेट्रोल पंप येथे अहिल्या नगर जिल्हा मार्गे येणारा रस्ता, रेल्वे स्टेशन मार्गे येणारा रस्ता, मध्यवर्ती बस स्थानक मार्गे येणारा रस्ता आणि क्रांती चौक मार्गे येणारा जालना रोड हे मुख्य रस्ते शिवसेना पदाधिकारी, शिवसैनिक व शेतकऱ्यांनी अडवले. शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी झालीच पाहिजे... शेतकऱ्यांना एक रुपयात पिक विमा मिळालाच पाहिजे.. लबाड सरकार मुर्दाबाद.. आश्वासन देऊन पळ काढणाऱ्या सरकारचा धिक्कार असो, अशा जोरदार घोषणाबाजी आंदोलकांनी यावेळी केल्या.

आंदोलकांनी शहराचे मुख्य रस्तेच अडवल्यामुळे पोलिसांनी आंदोलकांना ताब्यात घेऊन क्रांती चौक पोलीस स्टेशनात आणल्यानंतर कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून सोडवून दिले.

महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीदरम्यान शेतकऱ्यांना दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करावी. राज्य सरकारला शेतकऱ्यांना दिलेल्या आश्वासनांचा विसर पडल्याने लबाड सरकारला शेतकऱ्यांचा आक्रोश लक्षात यावा. तसेच विधानसभा निवडणूक दरम्यान आश्वासन दिलेल्या 10 कलमी योजना राबविण्यात याव्या, अशी मागणी अंबादास दानवे यांनी केली.

दरम्यान, शिवसेना उपजिल्हाप्रमुख संतोष जेजुरकर यांनी गुलाबी फेटा, धोतर आणि कुर्ता घालून शेतकऱ्यांचा आसूड पुस्तकांचे लेखक व दिवंगत थोर समाजसेवक महात्मा फुले यांच्या पेहरावात या आंदोलनात सहभागी झाले होते. याप्रसंगी महानगरप्रमुख राजू वैद्य, उपजिल्हाप्रमुख अरविंद धिवर, संतोष जेजुरकर, अशोक शिंदे, विजय वाघमारे, संतोष खेंडके, विठ्ठल बदर पाटील, चंद्रकांत गवई, शहरप्रमुख दिग्विजय शेरखाने, विधानसभा संघटक वीरभद्र गादगे आदींची उपस्थिती होती.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची बनावट सही : खोटे नियुक्तीपत्र देत मंत्रालयात नोकरीचे आमिष



**चाळीसगाव :** मुख्यमंत्र्यांची बनावट स्वाक्षरीचा वापर करत मंत्रालयात नोकरीचे आमिष दाखवत एका युवतीची फसवणूक झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. चाळीसगाव तालुक्यातील तिघांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच या प्रकरणाचा तपास पोलिसांकडून केला जात आहे.

चाळीसगाव तालुक्यातील सायगाव येथील एका युवतीला मंत्रालयातील लिपिक पदावर नियुक्ती मिळवून देण्याचे आमिष दाखवण्यात आले होते. तिला दिले गेलेले नियुक्ती पत्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावाने बनावट लेटरहेडवर व खोट्या स्वाक्षरीनिशी तयार करण्यात आले होते. मात्र, मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयातील अधिकृत प्रक्रियेनुसार अशा नियुक्त्यांसाठी विभागप्रमुख किंवा सचिव यांची स्वाक्षरी अनिवार्य असते, हे लक्षात आल्यावर युवतीला शंका आली.

फसवणूक झालेल्या तरुणीचे नाव गीता कापडणे असून त्या चाळीसगाव तालुक्याच्या रहिवासी आहेत. गीता यांना देण्यात आलेल्या जॉइनिंग लेटरबाबत त्यांनी चौकशी केल्यानंतर सर्वेश भोसले याच्याकडे त्यांनी विचारणा केली. त्यावेळी सर्वेशने रणजीत मांडोळेच्या मदतीने इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या मुख्यमंत्र्यांच्या नाममुद्रासहित पत्रावर मजकूर टंकलिखित करून देवेंद्र फडणवीस यांची बनावट स्वाक्षरी वापरून जॉइनिंग लेटर तयार केल्याची कबुली दिली. या संपूर्ण फसवणूक प्रकरणात तिसरा संशयित तुषार उर्फ रोहित बेलदार याचा देखील समावेश आहे.

या प्रकरणी पोलिसांनी संशयित सर्वेश प्रमोद भोसले याच्याकडे चौकशी केली असता, त्याने खळबळजनक माहिती उघड केली. त्याने "cm officer letter Maharashtra" असा सर्च इंटरनेटवर करून मिळालेल्या नमुन्याच्या आधारे खडकी येथील स्वामी ग्राफिक्सवर रणजीत मांडोळे यांच्या मदतीने बनावट मजकूर तयार केला होता. त्यानंतर त्या पत्रावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची नक्कल स्वाक्षरी करून बनावट जॉइनिंग लेटर तयार करण्यात आले असल्याचे स्पष्ट झाले.

## संभाजीनगर जिल्ह्यातील रुग्णांना मोठा दिलासा : सर्व महागड्या तपासण्याचे शुल्क निम्मे



**छत्रपती संभाजीनगर :** जिल्ह्यातील जिल्हा नियोजन समितीची बैठक पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. यात सर्वात महत्त्वाचा निर्णय घाटी मेडिकल महाविद्यालय किंवा कॅन्सर रुग्णालयामध्ये येणाऱ्या रुग्णांना सीटीस्कॅन किंवा एमआरआयसाठी लागणाऱ्या शुल्कात ५० टक्के सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

छत्रपती संभाजीनगरमधील घाटी म्हणजेच शासकीय रुग्णालयात केवळ जिल्ह्यातीलच नाही तर मराठवाड्यातील रुग्ण उपचारासाठी येत असतात. त्यांच्यासाठी हा अत्यंत महत्त्वाचा निर्णय आहे. या संबंधी माहिती देताना पालकमंत्री संजय शिरसाट यांनी सांगितले की, घाटी मेडिकल महाविद्यालय किंवा कॅन्सर रुग्णालयामध्ये येणारे रुग्ण हे अत्यंत गरीब कुटुंबातील असतात. त्यामुळे या हॉस्पिटलमध्ये सीटीस्कॅन आणि एमआरआय करण्यासाठी त्यांच्याकडे पैसे उपलब्ध नसतात. त्यामुळे या सर्व तपासण्या करण्यासाठी लागणारे शुल्क हे निम्म्याने कमी करण्यात आले आहे. आता ५० टक्के सवलती मध्ये या सर्व तपासण्या केल्या जाणार आहे. ही रक्कम जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून वर्ग करण्याचा निर्णय पालकमंत्री संजय शिरसाट यांनी आज झालेल्या बैठकीमध्ये घेतला आहे.

ग्रामीण भागामध्ये स्मशान भूमीची अत्यंत दुरावस्था झालेली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व आमदारांनी आपल्या निधीतूनच एक कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी स्मशान भूमीसाठी वापरण्याचे सांगण्यात आले आहे. तसे निर्देश देखील जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत, असे देखील संजय शिरसाट यांनी म्हटले आहे.

हरित संभाजीनगर नावाने एक अभियान आता जिल्ह्यामध्ये राबवले जाणार असल्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी सांगितले. शाळा, कॉलेज असेल किंवा विभागात स्तरावरचा कोणताही अधिकारी असेल. सर्व जिल्हा भरात हे अभियान राबवले जाणार आहे. या अभियानात आमदार, मंत्री, खासदार देखील सहभागी होणार असल्याचे संजय शिरसाट यांनी म्हटले आहे.

शहरातील वंदे मातरम सभागृह अनेक दिवसापासून बंद पडले आहे. केवळ ५० लाख रुपयांसाठी या सभागृहाची दुरावस्था होत आहे. त्यासाठी ५० लाख रुपयांचे निधी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच हे सभागृह महानगरपालिकेस हस्तांतरित करण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे संजय शिरसाट यांनी म्हटले आहे.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क

एम.फिल-पी.एच.डी. थेसिस

मराठी, हिंदी, इंग्रजी

कलर प्रिंट स्कॅनिंग

झेरॉक्स

स्पायरल बायंडिंग

लॅमिनेशन

थेसिस बायंडिंग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १३ जून २०२५


## अकरा दिवसांच्या खंडानंतर तासाभराच्या वादळी पावसाने जिल्ह्यात दाणादाण

**अहिल्यानगर** : मे महिन्यातच सरासरीच्या निम्मा पाऊस झाल्यानंतर जूनपासून दमदार पाऊस होईल, असा अंदाज होता. मात्र जून महिन्यात ११ दिवस मोठा पाऊस काही झाला नाही. परिणामी पेरणीपूर्व मशागतींची कामे होऊन पेरण्यांसाठी मान्सूनच्या पावसाची प्रतीक्षा होती. बुधवारी रात्री अखेर शहरासह जिल्ह्याच्या ग्रामीण भागात वादळी वारे व विजांच्या कडकडाटासह मान्सूनचा पहिलाच दमदार पाऊस झाला. तासाभरात धो धो बरसलेल्या पावसाने चांगलीच दाणादाण उडवली. वादळी वाऱ्यामुळे शहरातील बहुतेक भागातील वीज पुरवठा खंडीत झाला होता. दरम्यान १२ ते १४ जूनपर्यंत जिल्ह्यात पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला.

मे महिन्यात २२ दिवस अवकाळी पाऊस झाला. ५ ते ३० मे दरम्यान जिल्ह्यात २२० मिमी अवकाळी पावसाची नोंद झाली. तर गेल्या वर्षी १ ते १३ जूनपर्यंत ११५ मिमी पाऊस झाला होता. यंदा १ ते ११ जूनपर्यंत १६ मिमीच पाऊस झाला.

अवकाळीच्या पावसामुळे ग्रामीण भागात पेरण्या झाल्या, मात्र जिल्ह्यात प्रामुख्याने दरवर्षी जूनच्या पहिल्या आठवड्यात पाऊस झाल्यानंतर १५ जूनपासून पेरण्यांना सुरुवात होती. यंदा मात्र ११ जूनपर्यंत २५ हजार हेक्टरवर पेरण्या झाल्या. त्यातच बुधवारी सायंकाळी ५ वाजल्यापासूनच शहरात ढगाळ वातावरण होते. रात्री वादळी वारे, विजांच्या कडकडाटासह मान्सूनचा दमदार पाऊस झाला. शहरात वाऱ्याचा वेग जास्त असल्याने कल्याण रोड परिसरात झाडांच्या फांद्या महामार्गावर पडल्या होत्या.

नेप्ती नाका, दिल्ली गेट, सावेडी, केडगाव, नवनागापूर, भिंगार, चौपाटी कारंजा, माळीवाडा या भागातील रस्त्यांवर पावसामुळे मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. पावसाने उसंत दिल्यानंतर या रस्त्यांवर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. काही ठिकाणी किरकोळ स्वरुपाच्या घटना घडल्या. दरम्यान, जिल्ह्यातील नेवासे तालुक्यातील सोनई, शनिशिंगणापूरला पाऊस झाला असून, झाडे पडली आहेत.

बुधवारी जिल्ह्याच्या बहुतांशी भागात मान्सूनच्या उर्वरित पान ४ सोलर प्लेटा अर्धा किमी वर,केळी बागा जमीनदोस्त कुकाणे परिसरातील देवसडे, तेलकुडगाव, देडगाव, चिलेखनवाडी, देवगावं, भेंडे शिवारात केळीच्या बागा जमीनदोस्त झाल्या अनेक ठिकाणी वाड्या वस्त्यावर घरासमोरील पडव्या, शेड,उडून पडले. वीज पंप, सोलर ऊर्जा च्या प्लेटा अर्धा किमी अंतरावर उडून पडल्या. काही ठिकाणी झाडे उनमळून पडली. तर काही ठिकाणी वीज पडल्या.विजेचे पोल वाकल्याने वीज पुरवठा खंडीत झाला.

# अपघातग्रस्त विमानात ७ मराठी प्रवासी





**मुंबई** : गुजरातच्या अहमदाबादमध्ये एअर इंडियाचे एक प्रवासी विमान कोसळले. त्यात १०० हून अधिक प्रवाशांचा मृत्यू होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मृत प्रवाशांत ४ केबिन क्रू व ३ प्रवासी अशा एकूण ७ मराठी प्रवाशांचाही समावेश आहे. विशेष म्हणजे क्रू सदस्या अपर्णा महाडिक ह्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या नातलग असल्याची माहिती समोर आली आहे. यासंबंधीच्या माहितीनुसार, एअर इंडियाचे AI१७१ विमान अहमदाबादहून लंडनच्या दिशेने झेपावले होते. या विमानाने दुपारी १ वाजून ३८ मिनिटांनी उड्डाण केले. पण त्यानंतर ३-४ मिनिटांतच ते एका नागरी इमारतीवर कोसळले. विमान कोसळल्यानंतर त्यात एक मोठा स्फोट झाला. त्यामुळे या दुर्घटनेत शेकडो जणांचा बळी गेल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

एअर इंडियाच्या माहितीनुसार, अपघातग्रस्त विमानात २४२ प्रवासी होते. त्यात १२ क्रू मेंबर्स व २३० प्रवासी होते. १२ एक क्रू मेंबर असणाऱ्या अपर्णा महाडिक (कर्मचारी संख्या: ८०००८७२) या खासदार सुनील तटकरे यांचा सख्खा भाचा अमोल यांच्या पत्नी आहेत. त्या एअर इंडियात सीनियर केबिन क्रू म्हणून कार्यरत होत्या. त्यांचे पती अमोल स्वतःही एअर इंडियामध्ये पायलट म्हणून कार्यरत आहेत. ते दोन तासांपूर्वी दिल्लीत लँड झालेत. त्यानंतर ते तत्काळ अहमदाबादला जाणार आहेत, असे महाडिक कुटुंबीयांनी सांगितले.

अपर्णा महाडिक यांच्याशिवाय महादेव पवार, आशा पवार, मयूर पाटील, मैथिली पाटील, दीपक पाठक, रोशणी सोंघरे या ६ मराठी प्रवाशांचाही या दुर्घटनेत बळी गेला आहे. पण त्यांची पुष्टी अद्याप झाली नाही. मैथिली पाटील (कर्मचारी संख्या: ८००४७४२९), दीपक पाठक (कर्मचारी संख्या: ८१०३३१८७) व रोशणी सोंघरे (कर्मचारी संख्या: ८००५५१४६) हे तिघेजण अपर्णा महाडिक यांच्यासारखेच एअर इंडियाचे केबिन क्रू होते.

दुसरीकडे, एअर इंडियाच्या अपघातग्रस्त विमानात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी प्रवास करत होते. या दुर्घटनेत त्यांचाही मृत्यू झाला असण्याची शक्यता आहे. त्यांचा विमान प्रवासातील एक फोटोही समोर आला आहे. त्यात ते कोणत्या तरी कामात व्यस्त असल्याचे दिसत आहे. दरम्यान, विमान बी जे मेडिकल कॉलेजच्या हॉस्टेलवर कोसळले. त्यात काही निवासी डॉक्टर्सचा मृत्यू झाल्याचा दावा केला जात आहे.


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103 8830838903



इरफान इनामदार
मो. 8956362639
8087880274
9405109103

E-mail : sahilcomputer05@gmail.com

• डी.टी.पी.जॉब वर्क
• मराठी, हिंदी, इंग्रजी
• एम.फील-पी.एच.डी.,थेसिस
• स्पायरल / हार्ड बाईन्डींग
• लॅमिनेशन
• कलर प्रिंट

साहिल
कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.